CMYK

# गुत्तेदार विश्वस्तांची तटबंदी नारायणगडाने उधळली


बीड । बुधवार

१६.०७.२०२५

वर्षे : ५ अंक : १०६

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● https://marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■







dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955



# गवते - जाधवांची पोलखोल, महंतांचा बांध फुटला



**बीड । प्रतिनिधी**

नारायण गडावर भोगी त्यागींना छळू लागले , आम्ही सीए जाधव व बळी गवते यांचे पाप सहन करत आहोत . गेल्या दहा वर्षे विकास साधला गेला मात्र गुत्तेदारी डोक्यात असलेल्या विश्वस्त कडून त्रास होत असल्याचे सांगत नारायणगडाचे महंत यांचा गडावर आज अश्रू आणि भावनांचा बांध फुटला . यावेळी हजारो भाविकांनी महंतांच्या शब्दांना मान्यता देऊन उत्तर अधिकारी संभाजी महाराजांना अनुमोदन दिले . सदरील कार्यक्रम महंत स्व महादेव बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित होता .

श्रीक्षेत्र नगद नारायण गडाची बदनामी ट्रस्टी मधील दोघे जण स्वार्थासाठी करत आहेत. खूप त्रास झाला मी सहन केला मात्र गडाची बदनामी सहन होता नाही म्हणून बोलत आहे.उत्तर अधिकारी यांच्या निवडीला कोणाचाही विरोध नाही.ट्रस्टी च्या सह्या आहेत. अस म्हणत महंत शिवाजी महाराज यांनी



गडाच्या वादाला पूर्ण विराम दिला. पुढे बोलता नारायणगड गडाची मोठी परंपरा आहे.. ही तपाची भूमी आहे. पंढरीचा देव नारायण गडावर आला. नारायण गडाची बदनामी भक्त करत नाहीत.आम्ही नेमलेली ट्रस्टी यांनी त्रास सुरू केला आरोप करत आहेत गडाच उतले आहेत. मेटे साहेबांनी आणलेला २५ कोटीचा विकास निधी साठी हे सगळे दोन ट्रस्टीने सुरू केले ▶▶ उर्वरित पान २ वर

### ● नात फक्त गडाशी

**आम्ही जेव्हा महंत होतो तेव्हा आमचे नाते केवळ गडाशी असते . गुरु शिष्य परंपरा हीच आमच्या नात्याची विन आहे . संभाजी महाराज हे नात्यातले आहेत म्हणून उत्तरअधिकारी हा आरोप चुकीचा सांगताना त्यांनी माणिक बाबा व महादेव बाबांचा संदर्भ सांगितला . माणिक बाबा व महादेव बाबा चुलते पुतणे होते तेव्हा कुणी पुतण्यास महंत करण्यावर बोलले नव्हते कारण महंतांचे नाते नसते , जे नातं ते गड आणि पांडुरंगाशी असे बोलून शिवाजी बाबानी आरोप खोडसाळ असल्याचे सिद्ध केले .**

### ● महाराजांच्या पुतळ्यात गवतेनी पैसे खाल्ले

**बळीराम गवते आणि सी ए जाधव यांनी पाच वर्षाचे ऑडिट केले नाही जमीन विकण्याचा आरोप आमच्यावर करत आहे. आमची चौकशी करा अस म्हणतं आहेत. दहावर्षापूर्वी गडावर शिवाजी महाराजांच्या पुतळ्यासाठी वर्गणी,पैशे गोळा केलेले बळीराम गवते नी खर्च केले..माझ्या वेदना जाणून घेण्यासाठी भाविक आले आहेत. नारायण गड सर्व भाविकांचा आहे.. भाविक यासंदर्भात निर्णय घेतली अस महाराज म्हणाले.**

### ● भक्त झाले भावुक

**महंत दोन दिवस उपाशी राहिले , मधुमेह चारशे पार झाला आम्ही देह ठेऊ मात्र गडाच्या अस्मितेला बट्टा सहन करू शकत नाही . महाराजांना त्रास झाला यावर भक्तांना वेदना झाल्याचे बोलले गेले . गडावर हजारो भाविकांनी महंताना पाठिंबा दर्शवला**

# भूमाफियांचे काळे कारनामे आ.संदीप क्षीरसागरांनी सभागृहात केले उघड

## बीड शहरातील आरक्षित भूखंडावर प्लॉटींग करून अब्जावधींचा घोटाळा



**बीड नगरपरिषद अंतर्गत सर्वे नंबर २९ तरफ माळी सर्वे नंबर १९४ तर बलगुजर सर्वे नंबर १९७ १९८ १९९ तरफ खोड सारडा रेसिडेन्सी व इतर, सर्वे नंबर ३४ ३५ ६८ ६९ ७९ तरफ गिराम, सर्वे नंबर १७३ तरफ बलगुजार, सर्वे नंबर ५३ सर्वे नंबर ५६ ५९ सर्वे नंबर १८८ तरफ पिंगळे, सर्वे नंबर १६ सर्वे नंबर १७ तरफ देशमुख सर्वे नंबर १५१ सर्वे नंबर १५२ तर बोबडे या सर्वे नंबर मध्ये भूमाफियांनी मोठ्या प्रमाणात आरक्षित असलेले भूखंड विक्री केले आहेत किंवा चुकीचा लेआउट मंजूर करत भूखंड आरक्षित ठेवलेले नाहीत विशेष बाब म्हणजे प्लेग्राउंड आणि इतर गोष्टींसाठी आरक्षित केलेली जागा या ठिकाणी विक्री करून शासनाची फसवणूक केल्याचा प्रकार आ.क्षीरसागर यांनी सभागृहात उघड केला आहे.**

**मुंबई । प्रतिनिधी**

गरपालिका प्रशासन, नगर रचना विभाग आणि रजिस्ट्री कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हाताशी धरून भ्रष्टाचार करत बीड मधील भूमाफियांनी अक्षरशः धुमाकूळ घातला आहे. शहरातील प्लेग्राउंड असो की मंदिर अथवा गार्डन किंवा महिला स्वच्छतागृह या सगळ्यांसाठी आरक्षित असलेल्या भूखंडावर प्लॉटिंग करून या भूमाफियांनी कोट्यावधी रुपयांचा महसूल बुडवत अब्जावधींचा घोटाळा केला आहे. यामध्ये ▶▶ उर्वरित पान २ वर

# ज्ञानराधा प्रकरणात रिझल्ट द्या: मुख्यमंत्री

## अर्चना कुटेंसह फरार झालेल्यांच्या अटकेसाठी पथक नेमण्याचे आदेश

**बीड । प्रतिनिधी**

राज्यात गाजलेल्या बीडच्या ज्ञानराधा मल्टिस्टेटप्रकरणी सीआयडी आणि बीड पोलिसांनी केलेल्या तपासावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त केली. ज्ञानराधासह सर्वच म ल्टिस्टेटप्रकरणी आता पत्रव्यवहार करू नका, तर मला थेट रिझल्ट द्या, अशा शब्दांत मुख्यमंत्री फडणवीस यांनी सीआयडी, बीड पोलिस, सहकार विभागाला खडे बोल सूनावले. विशेष पथक नेमून फरार अर्चना कुटे व इतर आरोपींना तत्काळ अटक करण्याचे आदेश फडणवीस यांनी सोमवारी विधानभवनात झालेल्या बैठकीत दिले.

जिल्ह्यातील ज्ञानराधा मल्टिस्टेटमध्ये ठेवीदारांच्या



३७१५ कोटींहून अधिकच्या ठेवी अडकल्या आहेत. दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सोमवारी विधानभवनात ज्ञानराधासह दिवाळखोरीत निघालेल्या म ल्टिस्टेटप्रकरणी बैठक घेण्यात आली. या वेळी मंत्री पंकजा म ुंडे, आ. सुरेश धस, आ. प्रकाश सोळंके, आ. विजयसिंह पंडित, आ. बबनराव लोणीकर, अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, एसडीएम कविता जाधव, ठेवीदार संघर्ष कृती समितीचे मुख्य प्रवर्तक सचिन उबाळे यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. ज्ञानराधाच्या संचालकांच्या २३८ मालमत्ता अद्यापही जप्त केलेल्या नसल्याचे निदर्शनास आले असून या मालम त्ता तातडीने जप्त करण्याच्या सूचना मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिल्या आहेत. त्यासाठी विशेष मोहीम राबवण्याच्या सूचनाही ▶▶ उर्वरित पान २ वर






# कृषी विभागाने शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले!

## दुबार पेरणीचे संकट असतानाही अहवालात पीक परिस्थिती छान ; शेतकऱ्यांचा संताप : डॉ.गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात मागील तीन आठवड्यांपासून पावसाने पूर्णतः पाठ फिरवली आहे. खरीप हंगाम ात पेरणी झालेली पिके धोक्यात आली असून, पावसाअभावी पिकांच्या उगवण क्षमतेवर गंभीर परिणाम झाला आहे. पिके माना टाकू लागली, तर काही ठिकाणी रोपे सुकून जात आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांसमोर दुबार पेरणीचे ▶▶ उर्वरित पान २ वर








# अतिक्रमण धारकांनी गाव तलावाच्या भिंती लगट केले बांधकाम तलाव फुटन्याचा धोखा!

## संबधित प्रकरणी विभागिय आयुक्त कार्यालयास स्वाभिमानी शेतकरी संघटनेने दिले निवेदन



**तलवाड़ा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे गावा लगट सरकारी गायरान जमिनी वर अंदाजे १०० ते १०२ एकर क्षेत्रामध्ये विस्तीर्ण अशा स्वरुपात असणाऱ्या पाझर तलावाच्या संरक्षण भिंतीवर कोणत्याही प्रकारचा अधिकार नसताना तलवाडा ग्रामपंचायतच्या तत्कालीन ग्रामसेवक व सरपंचांनी आर्थिक लाभाच्या उद्देशाने गैरव्यवहार करत अतिक्रमण धारकांनी पी टी आर दिल्याने अतिक्रमणधारकाने भिंत कोरून सदर ठिकाणी बांधकाम केल्यामुळे व ▶▶ उर्वरित पान २ वर

# आष्टी मतदार संघातील पाटोद्यात पारधी समाजाच्या घरावर जेसीबी फिरवून संसार उध्वस्त!



## झाडांचीही कत्तल – चौकशीची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

आष्टी मतदार संघातील पाटोदा शहरात पारधी समाजातील दिव्यांग पवार कुटुंबाच्या घरावर अचानकपणे जेसीबी फिरवून घर उद्ध्वस्त करण्यात आले. या प्रकारात केवळ घरच नव्हे तर परिसरातील २५ ते ३० झाडांनाही काटेकोरपणे तोडण्यात आले, असा आरोप स्थानिकांनी केला आहे. या प्रकारामुळे पारधी समाजात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.पाटोदा प्रशासना कडून पवार कुटुंबाला कोणतीही आधीची लिखित नोटीस देण्यात आली होती का? त्या जागेवरील असलेल्या झाडांची वृक्षतोड परवानगी घेण्यात आली होती का? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अद्याप अस्पष्ट आहेत. त्यामुळे ही कारवाई ▶▶ उर्वरित पान २ वर

CMYK

# ‘युनेस्को’च्या व्यासपीठावर 12 पराक्रम स्थळे

● महाराष्ट्र हा केवळ सह्याद्रीच्या कड्याकपारींनी नटलेला प्रदेश नाही, तर तो इतिहासाचा, पराक्रमाचा आणि स्वराज्याच्या महान संकल्पनेचा साक्षीदार आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेली गड-किल्ल्यांची शृंखला आजही त्यांच्या शौर्याच्या कथा सांगत उभी आहे. अशा १२ ऐतिहासिक किल्ल्यांना युनेस्को या जागतिक संस्थेच्या जागतिक वारसास्थळ मानांकनाची शिफारस झाल्याने महाराष्ट्राच्या गौरवात भर पडली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मंत्रिमंडळातील सर्व सदस्यांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे. सोबतच सामान्य जनतेने देखील गड-किल्ल्यांवर जाऊन आपला आनंद व्यक्त केला. आपला इतिहास प्रत्येकाला माहिती असणे आवश्यक असतेच. या शिवाय इतिहासातून लढण्याची प्रेरणा मिळते. भविष्याची रणनीती ठरवण्याची दिशा मिळते. येणाऱ्या पिढ्यांना आपल्या पुर्वजांसह जुनी संस्कृती अभ्यासाता येते. त्यामुळे ऐतिहासिक दुर्ग आपले कायम प्रेरणास्त्रोत आहेत. विशेषतः छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात निर्माण झालेले हे दुर्ग महाराष्ट्राच्या सर्वसामान्यांच्या नेतृत्वाच्या दूरदृष्टीची साक्ष देणारे ठरते. सोबतच अल्प आयुष्यात सुद्धा जबरदस्त इच्छाशक्ती असेल तर तुम्ही भीम पराक्रम जगापुढे ठेवू शकता. हजारो वर्ष येणाऱ्या पिढ्यांना मार्गदर्शन करू शकता असा वस्तूपाठ छत्रपती शिवरायांच्या या 12 किल्ल्यांनी महाराष्ट्राला, देशाला दिला होता. आता हा दूरदृष्टीचा वारसा यानिमित्ताने जागतिक झाला आहे.

●युनेस्को ; कार्य आणि भूमिका-ुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक शिक्षण, विज्ञान आणि संस्कृतीच्या माध्यमातून शांतता व सहकार्य वाढविण्याच्या उद्देशाने युनेस्को (United Nations Educational, Scientific and Cultural Organization) या संस्थेची स्थापना १६ नोव्हेंबर १९४५ रोजी पॅरिस (फ्रान्स) येथे झाली. युनेस्कोचा उद्देश म्हणजे जगातील



सांस्कृतिक आणि नैसर्गिक दृष्ट्या महत्त्वाच्या स्थळांचे जतन करणे, जपणे आणि जागतिक समुदायात त्यांची ओळख निर्माण करणे. यासाठी “World Heritage Convention, 1972” तयार करण्यात आले.

●भारताने १९७७ साली युनेस्कोच्या जागतिक वारसा करारावर स्वाक्षरी केली. तेव्हापासून अनेक स्थळांना या यादीत मान्यता मिळाली आहे. सध्या भारतात जवळपास ४२ जागतिक वारसा स्थळे आहेत (२७ सांस्कृतिक, ७ नैसर्गिक, १ मिश्र स्वरूपाची व इतर प्रस्तावित). यामध्ये राजस्थानच्या गडकिल्ल्यांचाही सहभाग होता. महाराष्ट्राचे गड किल्ले मात्र दुर्लक्षित होते. यानिमित्ताने त्याकडे जागतिक लक्ष वेधले गेले आहे. भारतातील स्थळांची शिफारस केंद्र सरकार अंतर्गत भारतीय पुरातत्व विभाग करतो. राज्य सरकार, स्थानिक संस्था आणि तज्ज्ञांच्या मदतीने केंद्र सरकार युनेस्कोला प्रस्ताव सादर करते.

●पराक्रमाच्या १२ यशोगाथा- महाराष्ट्रातील ११ किल्ले आणि तामिळनाडूमधील जिंजी किल्ला अशा एकूण १२ किल्ल्यांना युनेस्को जागतिक वारसा यादीत समाविष्ट करण्यासाठी नामनिर्देशन देण्यात आले आहे. हे सर्व किल्ले छत्रपती शिवाजी महाराजांच्या पराक्रमाचे जिवंत प्रतीक आहेत. स्वराज्याच्या राजधानीचा किल्ला रायगड, शिवाजी महाराजांचा सर्वात प्रिय किल्ला राजगड, अफझलखानाचा वध ज्या ठिकाणी झाला तो प्रतापगड, महाराजांच्या पराक्रमाचा साक्षीदार पन्हाळा, महाराजांचे जन्मस्थान शिवनेरी, भक्कम डोंगररांगेवर वसलेला आणि लष्करी दृष्टिकोनातून महत्त्वाचा लोहगड, मराठ्यांनी पहिला मोठा विजय मिळवलेला किल्ला साल्हेर, सागरी संरक्षणासाठी बांधलेला दुर्ग सिंधुदुर्ग, सागरी दळणवळणासाठी अत्यंत महत्त्वाचा सुवर्णदुर्ग, सागरी लढायांचे केंद्र विजयदुर्ग आणि मुंबई किनाऱ्याजवळील सागरी संरक्षणकवच असलेला खांदेरी किल्ला. तर तामिळनाडू राज्यातील दक्षिणेकडील रणभूमीवर मराठ्यांनी ताबा मिळवलेला जिंजी किल्ल्याचा यात समावेश आहे.

●तत्कालिन युद्धनीतीचे शिलालेख

महाराष्ट्रातील हे बारा किल्ले आपल्या शेकडो युद्धनीतीच्या प्रात्यक्षिकांसह उभे आहेत. हे वास्तुकलेचे प्रत्यक्ष दर्शन असले तरी जगाला आपल्या दगडांच्या कवितेतून तत्कालीन युद्धनीतीला सांगणारे उत्तम प्रतीचे जणू शिलालेख ही आहे.थोडक्यात, प्रत्येक किल्ल्याकडे आपली एक गाथा आहे.जगाला नवल वाटेल अशी रोचक प्रत्येकाची कथा आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील हे किल्ले राजकीय, लष्करी आणि सांस्कृतिक दृष्टिकोनातून अनमोल आहेत. प्रत्येक किल्ल्याचे वैशिष्ट्य स्वयंपूर्ण असून जागतिक पर्यटकांना देखील तत्कालीन युद्धनीतीची माहिती देणारे आहे. सह्याद्रीच्या कठीण डोंगररांगांवर आणि किनाऱ्यावर ही किल्ले बांधण्यात आली, ज्यामुळे शत्रूंपासून संरक्षण अधिक प्रभावी झाले. मराठा स्थापत्यकलेतील ‘माची’ एक वैशिष्ट्य असते. किल्ल्याच्या टोकाला किंवा बाहेरील भागात असलेले बुरुजयुक्त संरक्षण. अशा माच्या जगातील इतर कुठल्याही किल्ल्यांमध्ये दिसत नाहीत.

●शत्रूला सहज लक्षात न येणारे वळणदार, सुरक्षित दरवाजे ही एक विलक्षण प्रवेशद्वारांची रचना आहे. ‘गनिमी कावा’ अर्थात ‘गुरीला’ युद्धनीतीमध्ये अशी रचना किती आवश्यक असते याचेही महत्त्व या रचनेवरून कळते. हे किल्ले केवळ लढायांचे ठिकाण नव्हते, तर स्वराज्य संकल्पनेचा प्रचार करणारी केंद्रेही होती. युनेस्को अद्वितीय वैश्विक मूल्य या निकषावर आधारित स्थळांची निवड करते. यामध्ये ऐतिहासिक महत्त्व आणि वैभवशाली परंपरा, स्थापत्यशास्त्रातील वैशिष्ट्यपूर्ण रचना, जगात अन्यत्र न आढळणारा अद्वितीय स्वरूप, मानवतेच्या सांस्कृतिक आणि सामाजिक इतिहासाशी असलेली नाळ, संरक्षणाची अवस्था आणि व्यवस्थापन हे पाच गुणधर्म पाहिले जातात.या निकषांवर महाराष्ट्रातील किल्ले पूर्ण उतरतात, म्हणूनच यांना जागतिक वारसा स्थळाचा दर्जा देण्यासाठी युनेस्कोच्या यादीत समावेश झाला आहे.

● शिवरायांचा प्रताप जगव्यापी- या मान्यतेमुळे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य जगासमोर अधिक प्रभावीपणे मांडता येईल. त्यांच्या युद्धनीतीचा जागतिक स्तरावरील युद्धांच्या युद्धनीती सोबत अभ्यास होईल. जगाच्या पटलावर एका महान योद्धाच्या पराक्रमाचे चिंतन,मंथन होईल. हे फक्त महाराष्ट्राच्याच नाही तर भारताच्या सन्मानाचे लक्षण आहे. जागतिक पर्यटक देखील या ठिकाणी आकर्षित होतील, ऐतिहासिक पर्यटनाला चालना मिळेल आणि स्थानिक अर्थव्यवस्थेलाही उभारी मिळेल.

पान ४ वरून पुढे...

## महंत शिवाजी...

शिवाजी महाराज म्हणाले, की गेल्या काही दिवसांपासून आपल्याला काहीलोक नाहक त्रास देत आहेत, हा त्रास आता असह्य झाल्याने आपण समाजासमोर व्यक्त होत आहोत. आपण गडाचे कार्य करत असताना अनावधानाने काही चुका झाल्या असतील तर आपण भाविकांनी त्या चुका पोटात घ्याव्यात, त्या गोष्टी मला सांगाव्यात आपण त्या सुधारू, मात्र अशा गोष्टींवरुन कोणी नारायण गडची बदनामी करू नये. आपण पंढरपूर, आळंदी, पैठण, बीड व गडावर मोठमोठी कामे हाती घेतली आहेत, समाजातील सर्व भाविकांच्या पै-पै च्या देणगीतून कामे झाली आहेत व होतही आहेत. स्व. विनायकराव मेटे व मनोज दादा जरांगे पाटील यांच्या प्रयत्नातून गडावर २५ कोटींचा विकासनिधी आला. ही कामे आपल्याला मिळावित, या भावनेतून काहींनी गडावरील काहीनाकाही विषय काढून बदनामी सुरू केली, याचा आपणास प्रचंड मानसिक व शारीरिक त्रास होत असल्याची खंतही महंत शिवाजी महाराज यांनी व्यक्त केली. हे प्रकार थांबवा असे आवाहनही त्यांनी केले. महंत शिवाजी महाराज यांच्या या आवाहनानंतर येथे उपस्थित अनेक गावच्या भाविकांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. महंत शिवाजी महाराज यांनी श्री क्षेत्र नारायण गड व संस्थानचा केलेला विकास, अनेक शतकांची गडाची अध्यात्मिक परंपरा असून ही परंपरा महाराष्ट्रात वृद्धिंगत केली, गडासह विविध तीर्थक्षेत्रावर भाविकांना सुविधा उपलब्ध केल्या, हे महंत शिवाजी महाराज यांनी अविरत करावे, अशी भूमिका भाविकांनी मांडली. श्री क्षेत्र नारायण गडचे उत्तराधिकारी संभाजी महाराज यांची केलेली निवड, गडासह विविध ठिकाणी सुरु असलेली विकासकामे व महंत शिवाजी महाराज घेतील ते सर्व निर्णय शिरसावंद्य मानून गडाची भक्ती करू, असा विश्वास हजारो भाविकांनी व्यक्त केला. श्री क्षेत्र नारायण गड हा कोट्यवधी भाविकांचा आहे, समाजातील काही लोकांमुळे, गडाच्या कामात अडथळा येऊ नये, अशा भावनाही अनेक भाविकांनी व्यक्त केल्या. यानंतर महंत शिवाजी महाराज यांनी सर्व भाविक हे गडाचे भक्त आहेत, सर्व आपलेच आहेत, कोणाविषयी गड कटुता ठेवणार नाही, असे मत व्यक्त करून राज्यात गडाच्या भाविकांची झालेली एकी कायम ठेवा, नगद नारायण सर्वांचे कल्याण करील, असा आशीर्वाद दिला. या बैठकीनंतर उपस्थित भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला.

पान ४ वरून पुढे...

## आगामी स्थानिक....

संघटिका प्रमिलाताई माळी , जिल्हा संघटक नितीन भैय्या धांडे उपजिल्हाप्रमुख रामराजे सोळंके , तालुकाप्रमुख गोरख अण्णा सिंघन , वडवणी तालुकाप्रमुख विनायक बप्पा मुळे, धारूर तालुकाप्रमुख बाबा सराफ , यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या बीड शहरातील सिद्धी विनायक कॉम्प्लेक्स येथील मध्यवर्ती कार्यालयात संपन्न झाली यावेळी बोलताना संपर्कप्रमुख परशुराम जाधव व जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर म्हणाले की , येत्या दोन महिन्यात स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सर्व निवडणुका पार पडणार आहेत त्यासाठी आजपासूनच प्रतेक गट ,गण व वार्डात आपला संभाव्य उमेदवार आपल्याला तयार करून ठेवायचा आहे, ज्यांना निवडणुक लढवायची आहे त्यांनी आजपासूनच कामाला लागून लोकांच्या संपर्कात रहायचे आहे, पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांचे स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका जिंकायचे स्वप्न पूर्ण करायचे आहे, महाराष्ट्रातील म हायुतीच्या शासनाने दिलेल्या फसव्या आश्वासनाचा जनतेपुढे पदार्पश करा , शेतकऱ्यांना या शासनाने दिलेल्या फसव्या आश्वासनाचे काय झाले याचा पाढा जनतेसमोर वाचून दाखवा , उद्धवसाहेब ठाकरे मुख्यमंत्री असताना केलेल्या कामाचं अवलोकन जनतेसमोर करा , एकंदरीत केंद्रातील व महाराष्ट्रातील हुकुमशाही असलेल्या सरकारला वठणीवर आणण्यासाठी येणाऱ्या निवडणुकीत विजय प्राप्त करण्यासाठी एकदिलाने कामाला लागण्याचे आवाहन संपर्कप्रमुख जाधव व जिल्हाप्रमुख वरेकर यांनी पदाधिकारी व शिवसैनिकांना केले.यावेळी जिल्हा संघटक ज्ञानेश्वर जाधव,सहसचिव श्रीकृष्ण गायके, विधानसभा प्रमुख नामदेव सोजे,बीड तालुका सचिव नंदु येवले , अल्पसंख्याक बीड तालुकासंघटक नसीर पठाण, युवा सेना वडवणी तालुकाप्रमुख नवनाथ म ोरे,महिला आघाडीच्या वडवणी तालुकाप्रमुख कौशल्या कदम, महिला आघाडीच्या माजलगाव तालुकाप्रमुख सुनिता जाधव , वडवणी महिला शहरप्रमुख शेषीकला अवचार,आशाताई लोखंडे,युवराज शिंदे, अशोक गोंडे ,बीडउपतालुकाप्रमुख अशोक सगळे, बीड उपतालुकाप्रमुख रामनारायण जाधव, बीड तालुका संघटक महादेव मुळे, बीड तालुका संघटक गोरख कदम, सहसचिव संदिप भानप ,भरत खरात , दिपक कांबीलकर,कलिमभाई पठाण , दत्ता सुरवसे , उद्धव काकडे, भैय्या

पान ४ वरून पुढे...

खोसे,वचिषट शेंडगे,विलास निपटे ,अंतिम पठाण,रवि म्हात्रे, शेख सादेक, शेख पठाण, आबासाहेब म्हात्रे,अशा राठोड, शितल कांबळे, सिंधुताई उजगरे, ज्ञानेश्वर सिंघन, अशोक जाधव,रामा जाधव, प्रवीण भोसले यांच्यासह बीड व माजलगाव मतदार संघातील पदाधिकारी व शिवसैनिक, महिला आघाडीच्या पदाधिकारी, युवासेनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते..

## शेतीला वीज...

पिकांना पाणी देणे शक्य होत असल्याने महावितरण विभागाच्या निष्काळाची पणा मुळे शेतकऱ्यांनी तीव्र संताप व्यक्त करत धारूर येथील महावितरण मुख्य अभियंता यांना निवेदन दिले आहे की महावितरण मधून काही व्यवसायांना समाधिकृत वीज पुरवठा दिल्याने शेती वेळेवर व उच्च दाबाचा वीजपुरवठा होत असल्याने खरीप हंगाम धोक्यात आला असल्याने वाढीव ट्रांसफार्मर उपलब्ध करून मुबलक वीज पुरवठा करावा अन्यथा लोकशाही मार्गाने आपल्या कार्यालया समोर उपोषण करणार असल्याचं इशारा निवेदन देण्यात यावेळी संभाजी तीबोले,अम ोल जगताप,पप्पू तिवारी,विनायक शिंनगारे,नितीन शिनगारे,विक्रम हजारे,पप्पू तिवारी, गणेश सावंत,सूर्यकांत जगताप,ईश्वर खामकर, राजू किरपणे, विनायक शिनगारे, सह इतर अनेक शेतकरी उपस्थित होते

## प्रवीण गायकवाड...

समाजातील अन्यायाविरोधात लढणाऱ्या व्यक्तींवर हल्ला होणे ही अत्यंत गंभीर बाब आहे. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन या प्रकरणातील सर्व आरोपींना त्वरित अटक करून कठोरात कठोर करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे या वेळी करण्यात आली. यावेळी बालाजी चव्हाण, विनायक शिनगारे, रमेश नखाते, सुरेश आंडील, सचिन थोरात, सटवा आंडील, तुषार खुळे, विश्वास शिनगारे, राहुल चव्हाण, ऋषिकेश गव्हाणे, भारत चव्हाण, अंकुश कदम, व्यंकटेश साखरे, बालाजी घोडके, परमेश्वर तिडके, मच्छिंद्र तिडके, राहुल नायकोडे, अशोक थोरात आदी समाज बांधव उपस्थित होते.

## कौशल्य विकास...

पान ४ वरून पुढे...

संचालक गंगाधर देशमुख, श्रीमती बागलाने, अमोल मुळे, नितीन क्षीरसागर आदी उपस्थित होते. पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार म ेळावा अंतर्गत सहभागी होणाऱ्या टाटाएआयजी, समर्थ नर्सिंग कॉलेज, गुरुकुल इंग्लिश स्कुल, एलआयसी, बीड आणि एस.जी.सोलुशन्स या आस्थापनांचा, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ अंतर्गत वैयक्तिक व्याज परतावा योजनेंतर्गत लाभ घेऊन उद्योजक झालेल्या लाभार्थ्यांचा, कौशल्य विकास योजनेंतर्गत उत्कृष्ट प्रशिक्षण दिल्याबद्दल प्रशिक्षण संस्थांचा सन्मान करण्यात आला. जन शिक्षण संस्थान, बीड या संस्थेमार्फत प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थीसाठी आयोजीत कौशल्य विकास काळाची गरज या विषयावरील निबंध स्पर्धा आणि ब्युटी पार्लरचे प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थीसाठी आयोजित सौंदर्य व वेशभूषा स्पर्धेच्या विजेत्यांना पारितोषिक व प्रम ाणपत्र देऊन गौरविण्यात आले. जन शिक्षण संस्थान, बीड या संस्थेमार्फत प्रधानमंत्री विश्वकर्मा योजनेतून कौशल्य प्रशिक्षण पूर्ण केलेल्या प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते टुलकिटचे वाटप करण्यात आले. अध्यक्षीय समारोप श्री. कुलकर्णी यांना केला. सूत्रसंचालन श्रीमती म ानुरकर यांनी केले. श्री. देशमुख यांनी आभार मानले.

## .... अन्यथा जिल्हा

शाळेमध्ये यापुर्वी घडलेल्या प्रकारामुळे सदरील शाळे मध्ये मुलींना शिक्षणासाठी पाठविण्यासाठी पालकांमध्ये भिती निर्माण झालेली आहे, त्यामुळे मुलींचे शैक्षणिक नुकसान होत आहे.

सदरील मुर्लीच्या शाळे मध्ये पुरुष स्टाफ असणे हा अत्यंत गंभीर प्रश्न असुन त्याकडे प्रशासनाने लक्ष केंद्रीत करुन मुलींच्या भवितव्याचा विचार करुन व त्यांच्या सुरक्षेला प्राधान्य देऊन सदरील शाळे मधील पुरुष शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच वॉचमन यांना दुसऱ्या ठिकाणी बदली करुन त्यांचे जागी फक्त महिलांचा स्टाफ रुजु करण्याची मागणी मा. शिक्षणाधिकारी (मा.), जि.प.बीड यांना पत्राव्दारे शेख सलमान शेख सईद यांनी केली आहे, १५ दिवसात कार्यवाही न झाल्यास दिनांक १५ ऑगस्ट २०२५ रोजी जिल्हा परिषद कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने तिव्र आंदोलन करण्याचा इशारा देखील या पत्रकात देण्यात आला आहे अशी माहिती प्रसिध्दी पत्रकात देण्यात आली,

पान १ वरून पुढे...

## गवते - जाधवांची....

आहे. आमच्या विरोधात आरोप कोर्टात केले.जमिनी विकल्या त्यावर सह्या याच ट्रस्टी च्या आहात पैसे त्यांनीच घेतले. भक्ताच्या सहकाऱ्याने आळंदी, पैठण, पंढरपूर,विकास सुरू आहे.गडाची बदनामी होत आहे.म्हणून आज बोलतोय.आज लाखो भाविकांनी बोलून दाखवल की महाराज म्हणतील ती पूर्व दिशा आहे. इथून पुढे गडाचा कारभार करण्यासाठी प्रत्येक गावातील दोन तरुण अशी शंभर ची कृती समिती तयार करण्यात येणार आहे.नगद नारायणासाठी प्राण द्यालया तयार आहे. सीए जाधव यांचे गाव कुठे आहे माहित देखील नाही पाच वर्षाचे ऑडिट अजून केले नसल्याचे बोलताना महंत शिवाजी महाराजांनी खडे बोल सुनावले .

## भूमाफियांचे काळे...

सर्वसामान्य नागरिक आणि शासनाची मोठी फसवणूक झाली आहे. बीड विधानसभा मतदारसंघाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी या भूमाफियांचे कारनामे पुराव्या सकट सभागृहात मांडले असून पुढील दोन महिन्यात याबाबत कारवाई करून संबंधित भूमाफिया यांच्यासोबतच अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल असे आश्वासन नगर विकास राज्यमंत्री यांनी दिले आहे. बीड शहराचे नागरिकीकरण वाढल्यानंतर जालना रोड असो की नगर रोड अथवा बार्शी रोड या भागामध्ये मोठ्या प्रमाणात प्लॉटिंग निर्माण झाले आणि बंगले अपार्टमेंट रो हाऊस तयार करणारी एक भूमाफी यांची टोळी बीडमध्ये सक्रिय झाली. बीड शहरात प्लॉटिंग करताना काही मंडळींनी नगरपालिका प्रशासन नगर रचना विभाग आणि दस्त नोंदणी कार्यालय येथील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हाताशी धरून ओपन स्पेस विक्री करत कोट्यावधी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याची चर्चा होती बीड शहरात भूमाफी यांनी जो काही नंगानाच केला आहे त्यामध्ये लहान मुलांच्या खेळण्यासाठी चे आरक्षित असलेले ग्राउंड असो किंवा गार्डन मंदिर सुलभ शौचालय यासाठी लेआउट मंजूर करताना जी जागा आरक्षित ठेवली आहे तीच जागा सर्वसामान्य प्लॉट धारकांना विक्री करून भूमाफियांनी कोट्यावधी रुपये छापले असल्याचे चर्चा होती. यासंदर्भात मागील सहा सात महिन्यापासून पाठपुरावा करणारे बीडचे आम दार संदीप क्षीरसागर यांनी मंगळवारी (दि१५) रोजी सभागृहात लक्षवेधी

पान १ वरून पुढे...

सूचनेद्वारे शासनाचे आणि संबंधित नगर विकास मंत्र्यांचे लक्ष वेधले. आम दार क्षीरसागर हे या विषयावर आक्रमक झाल्याचे सभागृहात दिसून आले.

## ज्ञानराधा प्रकरणात...

देण्यात आल्या. बीड जिल्ह्यात ज्ञानराधासह इतरही मल्टिस्टेट सोसायट्यांकडून ठेवीदारांची फसवणूक झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी एकत्रित बैठक घेऊन अहवाल द्यावा, फसवणूक झालेल्या ठेवीदारांना दिलासा देण्यासाठी ही कार्यवाही आवश्यक असल्याचे फडणवीस म्हणाले. सर्वच मल्टिस्टेट प्रकरणांत आरोपींची मालमत्ता जप्त करुन त्याचा लिलाव करून पैसे ठेवीदारांना देण्यात यावेत, यासाठीची प्रक्रिया प्रशासनाने गतीने करावी, अशी मागणी आम्ही केली आहे. नागरिकांना लवकर न्याय मिळण्याची अपेक्षा आहे.

## कृषी विभागाने...

संकट उभे राहिले आहे. मात्र अशा स्थितीतही जिल्हा कृषी विभागाने ९ जुलैच्या अहवालात जिल्ह्यातील खरीप पिकांची परिस्थिती चांगली असल्याचे नमूद केले आहे. यावरून संतापलेल्या शेतकऱ्यांनी थेट सवाल केला – कृषी विभागाचे डोके ठिकाणावर आहे काय? हा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे.

जिल्ह्यातील खरी परिस्थिती– ९ जुलै अखेर जिल्ह्यात ६,८१,३९८ हेक्टरवर पेरणी (८४.२३%) पूर्ण. , १ जून ते ९ जुलै दरम्यान सरासरी १९४.१ मिमी पावसाच्या तुलनेत केवळ १४०.८ मिमी पाऊस. सर्वात कमी पाऊस धारूर तालुका (४६.१ मिमी) आणि सर्वात जास्त पाऊस वडवणी तालुका (१२९ मिमी). पावसाने उघडीप दिल्यामुळे पिके सुकण्याचा धोका वाढला आहे. वातावरण ढगाळ असले तरी वरून पाऊस बरसत नाही. शेतकरी हवालदिल झाले आहेत.

शेतकऱ्यांचा तीव्र रोष : वातानुकूलित कार्यालयात बसून ‘पीक परिस्थिती चांगली’ असा अहवाल देऊन शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळले जाते. – मोहनराव कोटुळे, शेतकरी लिंबागणेश

लिंबागणेश येथील मोहनराव कोटुळे, दामोधर थोरात, श्रीहरी निर्मळ, चंद्रकांत आवसरे, रमेश गायकवाड, रामचंद्र मुळे, प्रमोद निर्मळ या शेतकऱ्यांनीही कृषी विभागावर रोष व्यक्त केला.

पान १ वरून पुढे...

रोग व पिकांचा धोका : यंदा कापसाऐवजी सोयाबीन पेरणी अधिक झाली आहे. परंतु लांबलेल्या पावसामुळे पिकांची वाढ खुंटते आहे. पाने खाणाऱ्या अळींचा व अल्प प्रमाणात खोडमाशीचा प्रादुर्भाव असल्याचे कृषी विभागाने नमूद केले आहे. मात्र यामुळे आर्थिक नुकसान नाही असा दावा करण्यात आला, जो शेतकऱ्यांच्या भावना दुखावणारा ठरला आहे.

## अतिक्रमण धारकांनी...

आज रोजी सुद्धा खोदकाम व बांधकाम सुरु असल्यामुळे गाव तलावास व संपुर्ण गावातील लोकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे तरी हा गैर व्यवहार करणाऱ्या व अतिक्रमण धारकावर योग्य ती कारवाई करण्यात यावी या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने यांनी दिनांक १५/७/२०२५ रोजी उप विभागिय आयुक्त कार्यालय संभाजी नगर यांना निवेदन दिले असुन

निवेदनात तक्रार कर्त्यांनी म्हटले आहे की तलवाडा तालुका गेवराई जिल्हा बीड, ग्रामपंचायत हद्दीतील गावाच्या पश्चिमेस असणाऱ्या सरकारी गायरान जमिनीमध्ये अंदाजे १०० एकर क्षेत्रावर विस्तीर्ण अशा स्वरूपात पाझर तलाव आहे. सदर पाझर तलावाचे खोलीकरणाचे काम सन २००१२-१३ मध्ये ख्रिसलेस फाउंडेशन पुणे, व अखिल भारतीय जैन संघटना यांच्यामार्फत तलावातील साचलेला गाळ शेतकऱ्यांच्या शेतात मोफत पुरवठा व्हावा या उद्देश्याने या तलावाच्या खोलीकरणाचे काम तत्कालीन माननीय विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले आहे.

तसेच मा. केंद्रेकर साहेबांच्या मार्गदर्शनाखालीच सदर तलावाच्या संरक्षण भिंतीचे मजबूती करणाचे देखील काम करण्यात आलेले आहे करीता सदर तलावाची पाणी साठवण क्षमता खूप मोठी वाढलेली आहे. परंतु आर्थिक लाभाच्या उद्देशाने तलवाडा ग्रामपंचायत सरपंच व ग्राम सेवक यांनी काही लोकांकडून लाखो रुपये वसूल करून गैरव्यवहार केलेला आहे. सरपंच व ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा तालुका गेवराई जिल्हा बीड यांना शासकीय पीटी आर देण्याचा कुठलाही व कोणत्याही प्रकारचा अधिकार नसताना हा गैरव्यवहार केलेला आहे.. आणि विशेष बाब म्हणजे त्याच तलावाच्या संरक्षण भिंतीवरचे पिटीआर

पान १ वरून पुढे...

ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा यांनी दिलेले आहेत. तलावाची भिंत कोरून त्या ठिकाणी आज रोजी सुद्धा अतिक्रमण धारक बेसमेंट बांधकाम करू लागलेले आहेत व काही जणांनी पक्क्या स्वरुपातील बांधकाम केलेले आहे. मा. आयुक्त साहेबांना विनंती आहे की, भविष्यात तलावात पाणीसाठा जास्त झाल्यास कोरल्या जाणाऱ्या संरक्षण भिंतीच्या ठिकाणी तलावाची संरक्षण भिंत फुटण्याची शक्यता नाकारताच येत नाही. तरी हा भविष्यातील संभाव्य धोका व ग्रामस्थांची जीवित हानी व वित्त हानी टाळण्यासाठी आज रोजीच योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनाच्या शेवटी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने यांनी केली आहे. सदर प्रकरणी काही ग्रामस्थांनी स्थानीय अधिकाऱ्याकडे वारंवार तक्रारी अर्ज केलेले आहेत. एवढेच काय, काही ग्रामपंचायत सदस्यांनी सुद्धा सदर गैरव्यवहार प्रकरणा विरोधात अमरण उपोषण सुद्धा केलेले आहे. परंतु आजपर्यंत कुठल्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेत सदर गैर व्यवहार करणाऱ्या वर कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. तरी सदर प्रकरणी नम्र विनंती करण्यात येते की हा गैरव्यवहार करणाऱ्या वर योग्य ती कडक कार्यवाही करण्यात यावी, आस्या प्रकारची मागणी निवेदनाच्या शेवटी करण्यात आली आहे.

## आष्टी मतदार...

बेकायदेशीर आहे का? या संदर्भात चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे. असुन समस्त पारधी समाजाने या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषी अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी एकमुखी मागणी केली आहे. दिव्यांग कुटुंबावर अन्याय करणाऱ्या प्रशासनाची ही वागणूक मान्य नाही, असेही समाज बांधवांनी स्पष्ट केले आहे.दरम्यान, संबंधित प्रशासनाकडून या प्रकरणावर अद्याप कोणतेही स्पष्टीकरण आलेले नाही. या प्रकारात मानवी हक्कांचे उल्लंघन झाले का? हे देखील तपासाचे एक महत्त्वाचे अंग ठरणार आहे.पारधी समाजाच्या न्यायासाठी आता सर्वत्र आवाज उठू लागला असून पवार कुटुंबीयांना न्याय मिळाला नाही तर लवकरच पाटोदा तहसील समोर आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा पारधी समाज संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी दिला आहे पदाधिकारी यांनी दिला आहे

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# धारूर तालुक्यातील ५६ पैकी ४१ ग्रामपंचायतचे सरपंच पद राहणार आरक्षित २९ ठिकाणी करणार महिला राज

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यात एकूण ५६ ग्रामपंचायत असून यामध्ये सरपंच पदाचे आरक्षण तहसील कार्यालयात काढण्यात आले यामध्ये ४१ ग्राम पंचायत चे सरपंच पद हे आरक्षित राहिले आहे तर २९ ग्रामपंचायतीवर महिला सरपंच राज करणार आहेत हे आरक्षण पुढील पाच वर्षासाठी असून आरक्षणामुळे अनेक इच्छुकांचे मात्र स्वप्न भंगल्याचे दिसून आले आहे.



धारूर तालुक्यात ५६ ग्रामपंचायत असून या ग्रामपंचायतीचे २०२५ ते ३० या कालावधीतील सरपंच पदाची आरक्षण सोडत तहसील कार्यालयाच्या सभागृहात तहसीलदार श्रीकांत निळे यांच्या अध्यक्षतेखाली काढण्यात आली यामध्ये अनुसूचित जाती करता नऊ ग्रामपंचायत आरक्षित असून याम ध्ये महिला करता पाच ग्रामपंचायत तर महीला करता अरक्षीत नसणाऱ्या चार ग्रामपंचायत आरक्षित आहेत याचप्रमाणे अनुसूचित जमातीसाठी दोन ग्रामपंचायत आरक्षित असून एक महिला व एक म हीला करता आरक्षीत नसणारी आहे इतर मागासवर्गीयासाठी १५ ग्रामपंचायत आरक्षित असून यामध्ये महिलांसाठी आठ ग्रामपंचायत आरक्षित आहेत तर महीला करता आरक्षीत नसणाऱ्या तर सर्वसाधारण महिलांसाठी १५ ग्रामपंचायत आरक्षित असून १५ सरपंच पदे ही फक्त सर्वसाधारण साठी आहेत ही आरक्षण सोडत निघाल्यावर अनेक ठिकाणची सरपंच पदे आरक्षित झाल्याने इच्छुक दावेदारांची मात्र स्वप्नभंगल्याचे दिसून आले या आरक्षण सोडतीमुळे मात्र पुढील पाच वर्षासाठी यापुढे राजकीय खलबते मोठ्या प्रमाणात सुरू होतील असेही चित्र दिसून येत आहे

*अनुसुचित जाती महीला साठी – थेटेगव्हाण, उमरेवाडी, पिंपरवाडा, मोहखेड, कोळपिंपरी

*अनुसूचित जमाती महिला करता आरक्षित नसणारी – काठेवाडी हिंगणी खुर्द, चिखली, शिंगणवाडी

* अनुसूचित जमाती महिला – आंबेवडगाव

* अनुसूचित जमाती महिला करता आरक्षित नसणारी – धुनकवड

* नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला करता– मैंदवाडी, भोगलवाडी, बोडखा, तांदळवाडी, संगम, देवठाणा, फकीरजवळा, सुकळी

* नागरिकांचा मागास प्रवर्ग महिला करता आरक्षित नसणारी – व्हरकटवाडी, चिंचपूर, सुरनरवाडी, गोपाळपूर, कोयाळ, अमला– निमला, चोंडी

* महिला करता आरक्षित सर्वसाधारण –चारदरी, भोपा, आरणवाडी, असोला, अवरगाव, चोरंबा, वाघोली,, घागरवाडा, हिंगणी बुद्रुक, खोडस,कुंडी, मोरफळी, रुईधारूर, गावंदरा, जहागीरमोहा

* सर्वसाधारण – पहाडी दहिफळ, पहाडी पारगाव, तेलगाव,कोथिंबीरवाडी, चाटगाव, देवदहिफळ, आसरडोह, अंजनडोह, गांजपूर, कान्नापुर, कारी, कासारी, मुंगी, पांगरी, सोनीमोहा

# शिवणी विद्यालयाच्यावतीने आगार प्रमुख श्री.डोके साहेब यांचा सत्कार संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

आदर्श शिक्षण संस्था,बीड संचलित–शिवणी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,शिवणी ता.जि.बीड विद्यालयास विद्यार्थ्यांसाठी घोडका राजुरी ते शिवणी विद्यालय एस.टी.बससेवा महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्यावतीने सुरु करण्यात आली.विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होवू नये, मुलींना सुरक्षित विद्यालयात येता यावे यासाठी विद्यालयाचे प्राचार्य श्री.येडे व्ही.बी. विद्यालयातील शिक्षक,घोडका राजुरीचे ग्रामस्थ व पालक यांच्या प्रयत्नातुन बससेवा सुरु झाली.

विद्यार्थ्यांसाठी एस.टी. बससेवा सुरु झाल्याबद्दल दि.१५/०७/२०२५ रोजी विद्यालयाच्यावतीने आगार प्रमुख श्री. डोके साहेब यांचा विद्यालयाचे प्राचार्य श्री. येडे व्ही. बी. व शिक्षक कर्मचार्यांच्यावतीने शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. यावेळी एस.टी. महामंडळ कार्यालयातील श्री. बनसोडे साहेब, श्री.कुलकर्णी सर, श्रीमती नागरगोजे मॅडम,श्री.होले सर यांची प्रमुख उपस्थिती होती. विद्यार्थ्यांसाठी एस.टी. बससेवा सुरु झाल्यामुळे पालक व विद्यार्थी यांनी समाधान व्यक्त केले आहे. विद्यार्थ्यासाठी घोडका राजुरी ते शिवणी विद्यालय एस.टी. बससेवा सुरु केल्याबद्दल श्री.डोके साहेब (आगार प्रमुख, बीड), श्री.बनसोडे साहेब, श्री.कुलकर्णी सर,श्रीमती नागरगोजे मॅडम, श्री.होले सर यांचे शिवणी विद्यालय, घोडका राजुरीचे ग्रामस्थ, पालक व विद्यार्थ्यांच्यावतीने. मन:पूर्वक धन्यवाद व आभार.

# जिद्द, परिश्रमातून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करा : जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

## बीड जिल्हा प्रशासनातर्फे प्रेरणादायी व्याख्यानमाला ; विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**बीड । प्रतिनिधी**

स्पर्धा परीक्षेचा प्रवास व्यक्तिमत्त्व विकासाचा अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. तरूणांच्या ध्येयपूर्तीसाठी स्पर्धा परीक्षेसाठीचे मार्गदर्शन निश्चित जिल्हा प्रशासनाकडून करण्यात येईल. तरी देखील प्रत्येकाने स्पर्धा परीक्षेत, यासह जीवनात यश संपादन करण्यासाठी स्वत:चे स्पष्ट ध्येय ठेवावे. जिद्द व परिश्रमातून आपल्या कुटुंबीयांसह जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी तरूणांना केले. स्पर्धा परीक्षा तयारीत विद्यार्थ्यांना दर्जेदार मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या संकल्पनेतून बीड जिल्हाधिकारी कार्यालयात सोमवारी (ता.१४) स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबिराचे उद्घाटन झाले. या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. शिबिरात परीविक्षाधीन पोलीस





उपअधीक्षक श्रीमती पूजा पवार आणि महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेले उपप्रादेशिक परिवहन अधिकारी श्रीकृष्णकुमार बाहेती यांनी मार्गदर्शन केले. यावेळी अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, नायब तहसीलदार प्रशांत जाधवर, राजेश सुपेकर, महादेव चौरे, दादासाहेब शेळके आदी उपस्थित होते. श्रीमती पवार यांनी स्वानुभवातून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. स्वप्नांचा पाठपुरावा, नैतिक मूल्यांची जाणीव आणि अभ्यासातील शिस्त या विषयांवर मार्गदर्शन केले. यशाचा प्रवास, अडचणींवर मात करण्याचे तंत्र, अभ्यासाचे नियोजन, वेळ व्यवस्थापन, परीक्षा तयारीतील सकारात्मक आणि नकारात्मक टप्पे याबाबत श्री. बाहेती यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी त्यांनी नैतिक मुल्ये, कौटुंबिक आणि सामाजिक समतोल याबाबतही विचार मांडले. कार्यक्रमातील संवाद सत्रात विद्यार्थ्यांनी विचारलेल्या शंकांचे निरसन जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, पोलिस उपअधीक्षक आणि उपप्रादेशिक अधिकारी यांनी केले. अपर जिल्हाधिकारी धार्मिक यांनी प्रास्ताविक केले. सूत्रसंचालन ग्राम महसूल अधिकारी काजल ससाणे आणि शरद घोडके यांनी केले. आभार जाधवर यांनी मानले.

# माजलगावात चातुर्मासाचा शुभारंभ

## प.पू.पद्मऋषीजी म.सा. व प.पू. शालीभद्रजी म.सा. यांचे सानिध्य लाभदायक: भाविकांनी प्रवचनाचा लाभ घ्यावा

**माजलगाव । प्रतिनिधी**

माजलगाव शहरात प.पू. पद्मऋषीजी म.सा. व प.पू. शालीभद्रजी म.सा. यांच्या पावन सानिध्यात चातुर्मासाचा शुभारंभ झाला आहे. या पवित्र चातुर्मास काळात दररोज विविध आध्यात्मिक विषय व जीवन शैलीवर आधारित प्रवचन तसेच विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या संपूर्ण चातुर्मास काळात प.पू.गुरूंमहाराजांच्या ज्ञानमय प्रवचनांचा लाभ घेता येणार असून, त्यांच्या मंगल दर्शनाने भक्तगणांना आत्मिक शांती व आध्यात्मिक उन्नतीचा




अनुभव मिळणार आहे. या पर्वाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन स्थानिक जैन संघटनेकडून करण्यात आले आहे. भाविकांनी दररोज आयोजित होणाऱ्या प्रवचनांना उपस्थित राहून धर्म, संयम व साधनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**● दररोज होणाऱ्या प्रवचनास उपस्थित रहा**

**माजलगाव शहरातील मठ गल्ली भागात असणाऱ्या जैन स्थानक येथे दररोज सकाळी ८:४५ ते ९:४५ वेळेत प्रवचनाचे आयोजन केलेले आहे. तरी परिसरातील, तसेच सर्व समाजातील भाविक–भक्तांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.**

# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये आत्मनिर्भर भारत विषयावर व्याख्यान संपन्न



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्स व विद्यार्थ्यांसाठी जागतिक युवा कौशल्य दिनाचे औचित्य साधून आत्मनिर्भर भारत – कल्पना आणि नावीन्यता या विषयावर महाविद्यालयातील इंग्रजी विभाग प्रमुख प्रोफेसर डॉ. बालाजी नवले यांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. त्यांनी राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्स व विद्यार्थ्यांना सक्षम भारतासाठी आत्मनिर्भरतेची आवश्यकता समजावून सांगितली. यातूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना २०४७ पर्यंत विकसित भारत निर्माण होण्यासाठी मदत होईल. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्सना आत्मनिर्भरता या विषयाची सखोल माहिती दिली. यासाठी सर्व कॅडेट्सने प्रामाणिकपणे प्रयत्न करावेत अशा आशावाद व्यक्त केला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी केले. कार्यक्रम ासाठी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सचिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. वायाळ सर यांबरोबरच महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्स, विद्यार्थी, प्राध्यापक मोठ्या संख्येने उपस्थित होती. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार उपप्राचार्य डॉ. मिलिंद गायकवाड यांनी मानले.

# मातोश्री शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करण्याची मुदत

**बीड । प्रतिनिधी**

मातोश्री शासकीय ईबीसी मुलांचे वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास विद्यार्थ्यांनी १५ ते ३१ जुलै, २०२५ या कालावधीमध्ये अर्ज सादर करावेत, असे आवाहन वसतिगृहाच्यावतीने करण्यात आले आहे. प्रवेशासाठी पात्र विद्यार्थ्यांनी ३१ जुलै, २०२५ पर्यंत विहित नमुन्यातील परिपूर्ण भरलेले अर्ज आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत (शासकीय सुट्ट्या वगळता) सादर करावेत. त्रुटी असलेले, अपूर्ण अर्ज व अंतिम तारखेनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही, असेही वसतिगृहाच्या गृहप्रमुखांनी कळविले आहे.

# ॲड. सर्जेराव तांदळे यांची निवड



**बीड । प्रतिनिधी**

भाजपा प्रदेश का. सदस्य ॲड. सर्जेराव तांदळे (तात्या) यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्य पदी निवड झाली . यावेळी सत्कार करून शुभेच्छा देताना शंकर देशमुख देविदास नागरगोजे, नवनाथ शिराळे, चंद्रकांत फड, शांतीनाथ डोरले, मनोज काका पाटील, अशोक रसाळ, अमोल वडतिले, राहुल जोगदंड, पंडित साहेब, विठ्ठल कंठाळे, अप्पासाहेब झोडगे, केशव बडे यांच्यासह भाजपा पदाधिकारी उपस्थित होते.

दैनिक मराठवाडा पत्र दि. १५/०७/२०२५

**टी सी हरवला आहे.**

**अंगद संदीपान फड,** या नावाचा इयत्ता १२ वी पास चा टीसी पिंपळनेर बीड प्रवासात हरवला आहे.
तरी सापडल्यास संपर्क साधवा.
**संपर्क नंबर : ७६६६९२३२७५**

**जाहीर प्रगटन**

**मा. श्रीमती ए. बी. निवारे १९ वे यह दिवाणी न्यायाधीश, व स्तर, बीड यांच्या न्यायालयात.**
**किरकोळ दिवाणी अर्ज ११०७/२०२५**
**शितल वगैरे विरुध्द निरंक**

अर्जदार :– १) शितल तुषार सांगळे, वय ३१ वर्ष, धंदा घरकाम, (२) अध्याय तुषार सांगळे, वय १३ वर्ष, धंदा शिक्षण, अ.पा. क. आई अर्जदार क्र. १ (३) श्लोक तुषार सांगळे, वय ०७ वर्ष, धंदा शिक्षण, अ.पा.क. आई अर्जदार क्र. १ (४) शांता आसाराम सांगळे, वय ६७ वर्ष, धंदा घरकाम, वरील सर्व रा. लक्ष्मीनगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज : बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत तुषार आसाराम सांगळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत तुषार आसाराम सांगळे यांचा मृत्यु दि. ०६/०६/२०२५ रोजी लक्ष्मीनगर, जालना रोड, बीड, ता. जि. बीड येथे झाला आहे. अर्जदार हा मयताचा एकमेव मूलगा आहे. मयताची पत्नी तसेच मयताचे आई वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार व गैरअर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्यांचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु **मयत तुषार आसाराम सांगळे** यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. दिले.

आज दिनांक १० माहे जूलै २०२५ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी
सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २० ऑगस्ट २०२५.
**(मार्फत– ॲड. एस. एस. महाजन)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक** **अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा**

**गेवराई येथील श्री. आर.ए. मिसाळ दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर यांचे न्यायालयात**
**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५६०/२०२५**
**सुंदर साहेबराव धताडमल व ईतर विरूध्द निरंक**

ज्याअर्थी **मयत नामे कौशल्या उर्फ कवसाबाई भ्र. साहेबराव घुताडमल** हे/ हया दिनांक २८/१२/२०२३ रोजी मौजे टाकळगांव, ता. गेवराई, जि. बीड येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १. सुंदर पि. साहेबराव घुताडमल, वय–५८ वर्षे, धंदा– मजुरी,रा. टाकळगांव,गेवराई,ता.गेवराई, जि.बीड, ह. मु. हनुमान वस्ती, भगत वस्ती, पुणे शहर, २. जनाबाई प्र. अशोक सुर्यवंशी, वय–४६ वर्षे, धंदा– घरकाम, रा. इंद्रायणी नगर, भोसरी, पुणे, ३. बबीता भ्र. सखाराम वाघमारे, वय – ५४ वर्षे, धंदा– घरकाम, रा. काठोडा, ता. जि बीड. यांनी सदरहू मयताच्या नावे खालील प्रमाणे रक्कम जमा आहे.

अ.क्र, बँकेच नाव / कंपनीचे नाव / पतसंस्थेचे नाव, क्रमांक, रुपये पै.

१. स्टेट बैंक ऑफ इंडीया शाखा हिरापुर, ता. गेवराई जि.बीड, बचत खाते क्र. ६२३१८१५२५९०, ३.२७,१००,५०/– अक्षरी रुपये तीन लाख सत्तावीस हजार शंभर रूपये व पन्नास पैसे व त्यावरील व्याज.

वरील रक्कम मिळणेकामी अर्जदार यांना वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. करीता भारतीय वारसा कायदा कलम ३७२ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत **नामे कौशल्या उर्फ कवसाबाई भ्र. साहेबराव धुताडमल** यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनाक ०२/०७/२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**पुढील तारीख १४/०८/२०२५**
**(मार्फत ॲड.डि. एम. रोटे गेवराई)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)** **शिक्का** **(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक** **सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई**

दैनिक मराठवाडा पत्र
● https://marathwadapatra.com
बुधवार, दि.१६ जुलै २०२५ पान ४



बीड बस स्थानकाचे काम अंतिम टप्प्यात आलेले छायाचित्र दिसत आहे.



# महंत शिवाजी बाबांचा निर्णय शिरसावंद्य

## हजारो भाविकांचा नारायण गडवर एकमुखी निर्धार



### ●दोघांपासून गडाला विक्षेप

गडावर झालेल्या बैठकीनंतर महंत शिवाजी महाराज यांनी माध्यम प्रतिनिधींशी संवाद साधला. यावेळी महंत शिवाजी महाराज म्हणाले, की गडाचे ट्रस्टी बळीराम गवते व सीए बी. बी. जाधव यांच्यापासून गडाच्या कामात विक्षेप झाला आहे. गडाचे भक्त व गडावरील हिशोबाचे काम सांभाळतील, या भावनेतून अनेकांचा प्रतिबंध असताना या दोघांना विश्वस्त मंडळात घेतले, मात्र यांनी आपली जबाबदारी पार पाडली नाही, आपण जे काही केले ते गडासाठी, असे असताना न्यायालयात गेले, मात्र आता सर्वांनी मिळून गडाची बदनामी थांबवावी, असेही महंत शिवाजी महाराज म्हणाले.

### ●तरुणांचे नेमणार मंडळ

भाविकांच्या बैठकीत बोलताना महंत शिवाजी महाराज म्हणाले, की गडाच्या कामात सर्वांना सहभाग देता यावा, गडावरील कामात मदत व्हावी यासाठी प्रत्येक गावातील दोन, असे शंभर तरुणांचे कार्यकारी मंडळ नियुक्त करणार आहे. भाविक व या तरुणांच्या सहकार्यातून यापुढे गडावरील कामे होणार. असल्याचेही महंत शिवाजी महाराज म्हणाले.

**बीड । प्रतिनिधी**

महाराष्ट्रातील कोट्यवधी भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या धाकटी पंढरी श्री क्षेत्र नारायण गड येथे महंत शिवाजी महाराज जो निर्णय घेतील तो निर्णय, मग तो उत्तराधिकारी असो, विकासकामांचा असो अथवा अन्य तो निर्णय शिरसावंद्य मानू असा विश्वास श्री क्षेत्र नारायण गड येथे हजारो भाविकांनी व्यक्त केला. भाविकांच्या या निर्धारानंतर महंत शिवाजी महाराज यांनी सर्व ग्रामस्थ, नागरिक हे गडाचे भक्त आहेत, सर्व मिळून गडाचा विकास करू, समाजाला अध्यात्मिक मार्गाला लावू अशी साद घातली.

गेल्या महिनाभरापूर्वी बीड शहराजवळील एका खाजगी वारकरी शिक्षण संस्थेत तेथील महाराज व एका विद्यार्थ्याचा पालक यांच्यात वाद झाला होता. हा आपसातील वाद असला तरी या वादात नाहक श्री क्षेत्र नारायण गड येथील उत्तराधिकारी यांचे नाव घेतले गेले होते. हा वाद आपसात मिटल्यानंतरही काही व्यक्ती मिडियाच्या माध्यमातून गडाची बदनामी करण्याचा प्रयत्न करत होते. हा प्रकार थांबविण्यासाठी महंत शिवाजी महाराज यांनी मंगळवारी वै. महंत महादेव महाराज यांच्या १४ व्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त कीर्तन केले, यानंतर भाविकांची बैठक घेतली. या बैठकीस हजारो स्त्री -पुरुष भाविकांची उपस्थिती होती. यावेळी उपस्थित भाविकांसमोर आपल्या भावना व्यक्त करताना महंत ▶▶ उर्वरित पान २ वर

## आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत विजय खेचून आणण्यासाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पदाधिकारी व शिवसैनिकांनी सज्ज रहावे : जाधव ,वरेकर



**बीड । प्रतिनिधी**

काँग्रेसच्या शिवसेना पक्षप्रमुख उद्धवसाहेब ठाकरे यांच्या आदेशानुसार व शिवसेना सचिव विनायक राऊत साहेब,संपर्कनेते सुनिल प्रभू साहेब, विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, मराठवाडा समन्वयक विश्वनाथ नेरुरकर, यांच्या मार्गदर्शनाखाली आज बीड व माजलगाव मतदार संघातील पदाधिकारी व शिवसैनिक यांची आढावा बैठक संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब, जिल्हाप्रमुख गणेशभाऊ वरेकर, माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर , महिला आघाडीच्या जिल्हा ▶▶ उर्वरित पान २ वर



## शेतीला वीज पुरवठा सुरळीत करा शेतकऱ्यांची मागणी

**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर परिसरातील शेतीला सुळरीत वीजपुरवठा करण्यासाठी वाढीव ट्रांसफार्मर उपलब्ध करून मुबलक वीज उपलब्ध करून द्यावा अन्यथा आपल्या महावितरण कार्यालयासमोर उपोषणा बसणार असल्याचा इशारा धारूर परिसरातील शेतकऱ्यांनी दिला आहे. धारूर तालुक्यात पावसाने दांडी मारल्याने पण्या अभावी दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे खरिपाच्या हंगामात शेतकऱ्यांनी पेरणी केली असून पाण्याअभावी पिके करू लागली आहे अनेक शेतकऱ्यांकडे मुबलक पाणी असूनही विजे अभावी ▶▶ उर्वरित पान २ वर

## प्रवीण गायकवाड यांच्यावरील भ्याड हल्ल्याचा जाहीर निषेध करत कारवाई करण्याची मागणी



**किल्ले धारूर । प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील समाज बांधवांच्या वतीने आज धारूर तहसीलदार निळे यांना निवेदन देऊन प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकरणातील आरोपींना तात्काळ अटक करून कठोर कारवाई करावी,अशी मागणी निवेदनाद्वारे केली आहे.

धारूर येथील समाज बांधवांनी तहसील कार्यालयात जाऊन तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. यावेळी उपस्थित अनेक कार्यकर्त्यांनी आपला रोष व्यक्त करत प्रवीण गायकवाड हे सतत सामाजिक प्रश्नांवर नेहमी सक्रिय असतात. समाजहिताचे काम करत असताना त्यांच्यावर झालेला हा हल्ला केवळ व्यक्तीवर नसून संपूर्ण समाजावरच आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या घटनांना आळा बसवण्यासाठी संबंधित आरोपींवर त्वरीत आणि कठोर कारवाई होणे गरजेचे आहे. यावेळी जर या प्रकरणात तात्काळ कारवाई झाली नाही, तर सरकारविरुद्ध तीव्र आंदोलन करण्यात येईल. ▶▶ उर्वरित पान २ वर

## छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्तीसाठी आवाहन

**बीड । प्रतिनिधी**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राजर्षी छत्रपती शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती योजनेंतर्गत दहावीमध्ये ७५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळालेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द घटकातील पात्र विद्यार्थ्यांनी महाडीबीटी पोर्टलवर ऑनलाईन पद्धतीने अर्ज करावेत, असे आवाहन समाज कल्याण विभागाचे सहायक आयुक्त प्रदीप ओगले यांनी केले आहे.



*बीड : प्रभु पंडिताराध्य शिवाचार्य महाराज माजलगावकर यांनी गुरुपौर्णिमा निमीत्त बीड जिल्ह्यात विशेष प्राविण्य संस्कार विद्यार्थीनी मानसी सचिन शहागडकर चा गौरव करत प्रमाणपत्र व गुरु आशिर्वाद देत शिष्यवृत्ती प्रदान केली.*


## कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन ; केंद्राकडून जागतिक युवा कौशल्य दिन साजरा

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हयात राबविण्यात येणाऱ्या विविध योजना, रोजगार मेळावे, इ. योजनांविषयी माहिती देत जागतिक युवा कौशल्य दिन आज (ता.१५) उत्साहात साजरा करण्यात आला. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र आणि जन शिक्षण संस्थान यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुशिल उचले, कौशल्य विकास अधिकारी समाधान किरवले, जन शिक्षण संस्थानचे अध्यक्ष उपेंद्र कुलकर्णी, उपाध्यक्ष श्रीमती. डॉ. चोले, ▶▶ उर्वरित पान २ वर








श्री गजानन महाराजांचा पालखी सोहळा इथून पुढे खंडेश्वरी देवी मंदिर इथे असेल, कंकालेश्वर नाही.


## .... अन्यथा जिल्हा परिषद कार्यालया समोर तिव्र आंदोलन करण्याचा इशारा : शेख सलमान शेख सईद

**बीड येथील अंजुमन ए-ईशात-ए-तालीम शिक्षण संस्था, बीड संचलित मिल्लीया माध्यमिक शाळा (मुलींची), बीड या शाळे मध्ये पुरुष शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची बदली करुन त्यांचे जागी महिलांचा स्टाफ रुजु करण्यात यावा**



**बीड । प्रतिनिधी**

अंजुमन ए-इंशात-ए-तालीम शिक्षण संस्था, बीड संचलित मिल्लीया माध्यमिक शाळा (मुलींची), बीड मध्ये सर्व मुली शिक्षण घेत आहेत. सदरील शाळे मध्ये यापुर्वी शिक्षक व शिक्षीकांचे अश्लिल व्हीडीओ बाहेर येऊन संस्थेची व संस्थाअंतर्गत शाळेची संपूर्ण महाराष्ट्रा मध्ये बदनामी झाली होती. त्याचा शाळे मधील मुलींच्या बाल मनावर वाईट परिणाम झालेला आहे. सदरील प्रकरणाला काही महिनेच झालेले असताना राज्य भरा मध्ये दररोज शाळकरी मुलींची छेड काढणे, विनयभंग करणे किंवा अतिप्रसंग करण्या सारखे प्रकार घडत आहेत. अशातच अंजुमन ए-ईशात-ए-तालीम शिक्षण संस्था, बीड संचलित मिल्लीया माध्यमिक शाळा (मुलींची), बीड या शाळे मध्ये पुरुष शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी असुन वॉचमेन देखील पुरुष आहे. यामुळे पुन्हा एकदा या शाळे मधील मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न उपस्थित झाला आहे. सदरील मुलींच्या शाळे मध्ये सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा स्टाफ हा महिलांचा असायला हवा आहे. जेणे करुन मुलींची छेड काढणे, विनयभंग करणे अशा प्रकारच्या घटनांना आळा बसेल.

सध्या बीड जिल्ह्या मध्ये दिवसेंदिवस मुलींच्या सुरक्षेविषयी प्रश्न गंभीर होताना दिसुन येत आहे, तसेच या मुलींच्या ▶▶ उर्वरित पान २ वर